महाराष्ट्र शासन

सत्यमेव जयते

# वैद्यकीय प्रशासन अधिकारी, यांचे कार्यालय

**महाराष्ट्र राज्य कामगार विमा सोसायटी,**

सर्वे नं. ६८९/९०, पंचदीप भवन, तळमजला, बिबवेवाडी, पुणे -४११०३७

**दुरध्वनी क्रमांक - ०२०-२४२१४१११** ई-मेल.establishpune.amo@gmail.com

जा.क्र.वैप्रअ पुणे/महा-राकाविसो/अ-४/निर्लेखन/जाहिरात/ 14816 /२०२५ दि. 19 DEC 2025

## जाहिरात

वैद्यकीय प्रशासन अधिकारी, महाराष्ट्र राज्य कामगार विमा सोसायटी, सर्वे नं.६८९/९०, पंचदीप भवन, बिबवेवाडी, पुणे -४११०३७. या महाराष्ट्र शासनाच्या कार्यालयातील खाली वर्णन केलेल्या निरुपयोगी, दुरुस्त न होण्यासारख्या व निर्लेखन केलेल्या वस्तुंची विक्री करावयाची आहे. त्याचा तपशील खालीलप्रमाणे.

१. लोखंडी साहित्य :- निर्लेखित केलेले मोडलेले लोखंडी रॅक, लोखंडी कपाटे व किरकोळ लोखंडी साहित्य अंदाजे वजन ८०० ते १५०० किलो.

२. लाकडी साहित्य :- निर्लेखन केलेले मोडलेले लाकडी कपाटे, स्टुल्स, खुर्च्या, व इतर किरकोळ साहित्य अंदाजे वजन ५०० ते ८०० किलो.

३. इतर साहित्य :- निर्लेखन केलेले संगणक व इतर वस्तुंचे सुटे भाग.

४. सदर साहित्य पाहण्याचे ठिकाण :- अ) वैद्यकीय प्रशासन अधिकारी, महा-रा.का.वि. सोसायटी, सर्वे नं.६८९/९०, पंचदीप भवन, बिबवेवाडी, पुणे-४११०३७.
ब) वैद्यकीय अधीक्षक, महा-रा.का.वि. सोसायटी रुग्णालय, मोहननगर, चिंचवड पुणे -४११०१९.
क) प्रभारी वैद्यकीय अधिकारी, महा-रा.का.वि. सोसायटी, सेवा दवाखाना चिंचवड, पुणे -४११०१९.

५. सदर साहित्य पाहणी करावयी वेळ :- पूर्व नियोजित वेळेनुसार सोमवार ते शुक्रवार दुपारी १२.०० ते सायंकाळी ४.०० या वेळेमध्ये शासकीय सुट्टी सोडून (पूर्व नियोजित वेळ ठरविण्यासाठी establishpune.amo@gmail.com या ईमेल वर संपर्क साधावा अथवा कार्यालयामध्ये व्यक्तीश भेटावे)

## अटी व शर्ती

१. सदर जाहिरात महाराष्ट्र शासनाच्या वेबसाईटवर प्रसिध्द झाल्याच्या तारखेपासून तिचा विहित कालावधी दि.३१/१२/२०२५ पर्यंत ठिक सायं.५.०० वाजेपर्यंत सिलबंद पाकीटामध्ये सादर करावीत. विलंबाने आलेल्या दरपत्रकाचा विचार केला जाणार नाही याची नोंद घ्यावी.

२. सदर दरपत्रके सिलबंद पाकीटामध्ये मा.वैद्यकीय प्रशासन अधिकारी महाराष्ट्र राज्य कामगार विमा सोसायटी, सर्वे नं.६८९/९०, पंचदीप भवन, बिबवेवाडी, पुणे-४११०३७ यांच्या नावे विहित मुदतीत या कार्यालयास सादर करावीत.

३. दरपत्रके स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार मा.वैद्यकीय प्रशासन अधिकारी व निर्लेखन समिती यांच्याकडे राखुन ठेवण्यात आलेला आहे.

४. फर्म बाबतचे कागदपत्रे शॉप ॲक्ट प्रमाणपत्र, पॅन कार्ड, जीएसटी नोंदणी क्रमांक असणे आवश्यक आहे.

५. विक्री करावयाच्या सर्व वस्तु वैद्यकीय प्रशासन अधिकारी, महा-रा.का.वि. सोसायटी, सर्वे नं.६८९/९०, पंचदीप भवन, बिबवेवाडी, पुणे-४११०३७, वैद्यकीय अधीक्षक, महा-रा.का.वि. सोसायटी रुग्णालय, मोहननगर, चिंचवड पुणे -४११०१९ व प्रभारी वैद्यकीय अधिकारी, महा-रा.का.वि. सोसायटी, सेवा दवाखाना

चिंचवड, पुणे -४११०१९. येथून स्वखर्चाने तात्काळ आदेश मिळाल्यानंतर ७ दिवसामध्ये घेऊन जाणे बंधनकारक आहे, अन्यथा सदर निविदा रद्द करण्यात येईल.

६. वस्तुंचे मोजमाप, ने-आण करण्याकरीता या कार्यालयामार्फत कोणतेही मनुष्यबळ, वाहन दिले जाणार नाही.

७. विक्री करण्यात येणाऱ्या साहित्यांची अंदाजे १/१० अनामत रक्कम रोखीने या कार्यालयातील रोखपाल यांच्याकडे जमा करावी लागेल, व उर्वरीत रक्कम साहित्याचे वजन केल्यानंतर तात्काळ रोखीने जमा करावी लागेल.

८. दरपत्रकावर खरेदीदाराची स्वाक्षरी असणे बंधनकारक आहे, स्वाक्षरी नसल्यास दरपत्रक ग्राह्य धरण्यात येणार नाहीत.

९. दरपत्रके उघडण्याच्या वेळी खरेदीदाराला किंवा प्राधिकृत प्रतिनिधी यांना हजर राहता येईल.

स्वाक्षरी /-

(डॉ. बाळकृष्ण सु. रंगदळ)
वैद्यकीय प्रशासन अधिकारी
महा-रा.का.वि.सोसायटी,पुणे-३७.